# जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

प्रशासकीय इमारत, स.नं. ४८८, जालना
(जिल्हा नियंत्रणक कक्ष)/(आपत्ती व्यवस्थापन)

दुरध्वनी क्रमांक [02482]-223132 टोल फ्री क्रमांक **1077** फॅक्स क्रमांक (02482)-226477,225326
**E-mail. rdcjalna@gmail.com , jalnaddmo@gmail.com Website:- www.jalna.nic.in , http://59.90.142.57/ddmajalna**

जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि- दिनांक २३/०३/२०२०

**वाचा :-** १) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
३) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना दिनांक १३/०३/२०२०, १४/०३/२०२० आणि १५/०३/२०२०.
४) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४.
५) या कार्यालयाचे समक्रमांकीत आदेश दिनांक २२/०३/२०२०.
६) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना क्रमांक DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दिनांक २३ मार्च २०२०.

**विषय:- कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव रोखण्यासाठी संपूर्ण जालना जिल्हयात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (३) प्रमाणे मनाई आदेश.**

## आदेश

ज्याअर्थी, जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणूमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषीत केला आहे. तसेच कोरोना विषाणूचा प्रसार भारतात व महाराष्ट्रातील जालना जिल्हयामध्ये गतीने पसरत आहे असे दिसून येत आहे. तसेच राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोवीड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ हा दिनांक १३/०३/२०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केली आहे. भारत सरकार आरोग्य मंत्रालय व महाराष्ट्र सरकार आरोग्य मंत्रालय यांनी जाहिर केलेप्रमाणे कोरोनाग्रस्त रुग्णाच्या संर्पकात लोकांनी येऊ नये. तसेच सार्वजनिक किंवा खाजगी जागेत पाच किंवा पाच पेक्षा अधीक व्यक्तींनी एकत्र येणे थांबणे, चर्चा करणे काही कार्यक्रमाचे आयोजन केल्यास कोरोना विषाणूचा संसर्ग व प्रार्दुभाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता सर्व सामान्य जनतेस व त्यांचे आरोग्यास धोका निर्माण होत असल्याचे माझी खात्री झालेली आहे. त्या करीता तात्काळ प्रतिबंधक उपाय योजना करणे आवश्यक आहे. अशा प्रतिबंधात्मक उपाययोजना फौजदारी दंड प्रक्रिया सहिंता कलम १४४ खालील तरतुदीच्या अनुषंगाने जनतेस, खालील नमूद व्यक्ती व आस्थापना व यांना उददेशुन काढणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झालेली आहे.

आणि ज्याअर्थी, शासनाच्या दिनांक १४/०३/२०२० अधिसुचने अन्वये महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० लागू केले आहे.

ज्याअर्थी, संदर्भ क्र. ६ अन्वये महाराष्ट्र शासनाने संपूर्ण राज्यात Lockdown तात्काळ अंमलासह दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत लागू केलेले आहे.

त्याअर्थी, मी **रविंद्र बिनवडे, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना** फौजदारी दंड प्रक्रीया संहीता १९७३ चे कलम १४४ (१) (३) अन्वये कोणत्याही व्यक्तीला संपूर्ण जालना जिल्हयातील क्षेत्रात, कोणत्याही रस्त्यावर, सार्वजनिक वाहतुकीचे रस्त्यावर, गल्लोगल्ली इ. ठिकाणी संचार, वाहतूक, फिरणे, उभे राहणे, थांबून राहणे, रेंगाळणे हे सर्व कृत्य मनाई करणारा आदेश खालील नमुद नियम व उपाययोजनांच्या अनुषंगाने तात्काळ अंमलासह **दिनांक २३/०३/२०२० रोजी पासुन ते दिनांक ३१/०३/२०२० रोजी पर्यंत** लागू करीत आहे.

१. जिल्हयातील सर्व सीमा जिवनावश्यक वस्तू / नाशवंत वस्तूंची वाहतूक व सेवा वगळता या आदेशान्वये बंद करीत आहे.
२. जिल्हयातील सर्व खाजगी वाहनांना(अत्यावश्यक वैद्यकीय सेवा, प्रवासी वाहतूक वगळून) वाहतूक करण्यांस बंदी करण्यांत येत आहे..
३. खाजगी वाहने अत्यावश्यक कारण असेल तरच निम्न स्वाक्षरीत यांची पूर्व परवानगीनेच सुरु राहतील.
४. जिवनाश्यक वस्तू,अत्यावश्यक वैद्यकीय सेवा,औषधे,अन्नधान्य,पशुखाद्य तसेच त्यांची ने आण करणारी वाहने सुरु राहतील.पशुंचे दवाखाने व कृषि मालाशी संबंधित वाहतूक सुरु राहील.
५. घर अलगीकरण (Home Quarantine) केलेल्या व्यक्तींनी सरकारच्या आदेशाचे/सुचनांचे तंतोतंत पालन करणे बंधनकारक राहील. पालन न केल्यास संबंधिताविरुध्द कडक दंडात्मक कार्यवाही करुन त्यांना शासकीय विलगीकरण कक्षामध्ये नेले जाईल.
६. सर्व नागरिकांना घरी थांबण्याबाबत आदेशीत करण्यात येत आहे. तसेच अनुज्ञेय कामासाठी वगळता अनावश्यक रित्या सार्वजनिक ठिकाणी विहीत कारणाशिवाय फिरण्यास मनाई राहील. तसेच त्यावेळेस त्यांनी Social Distancing चे नियम पाळावेत.

७. ०५ पेक्षा अधिक व्यक्तींना सार्वजनिक ठिकाणी जमण्यास प्रतिबंध करण्यांत येत आहे.

८. सर्व दुकाने व त्यातील व्यवसायीक आस्थापना ,कार्यालये आणि कारखाने,वर्कशॉप,गोडावून,यानी त्यांचे कामकाज बंद ठेवावे. तथापी जसे औषधी उत्पादने व जिवनावश्यक उत्पादने जसे डाळ आणि तांदूळ निर्मिती केंद्र,अन्न, दुग्धजन्य पदार्थ, चारा व खाद्य,अशा प्रकारच्या निरंतर उत्पादन करणारे आस्थापना व दुकाने चालू राहतील.

९. शासकीय कार्यालये, दुकाने आणि आस्थापना या कमीत कमी मनुष्यबळ व Social Distancing ( किमान ३ फुट चे अंतर) ठेवून चालू राहतील. तथापी त्यांना हात धूणे संदर्भात व हात निर्जतूकीकरण करणे संबंधी साहित्य उपलब्ध करुन देण्यात यावे.

१०.खालील दूकाने/आस्थापना ज्या जिवनावश्यक वस्तू आणि सेवा देतात त्यांना वरील निर्बध लागू राहणार नाहीत.

१.सर्व बॅंक,ATM,विमा, वित्तीय सेवा, आणि त्यासंबंधी सेवा.

२.प्रसारमाध्यमे/दृकश्राव्य माध्यमे.

३.आयटी व आयटीईएस त्यामधील दूरध्वनी,इटरनेट,पोस्ट खाते व संपर्क माध्यमे चालू ठेवण्यासाठी आवश्यक तत्संबंधीत आस्थापना.

४. जिवनावश्यक वस्तूची घरपोच सेवा देणा-या आस्थापना व वाहतूक करणा-या सेवा.

५.कृषि माल व उत्पादने यांची आयात -निर्यात व तत्संबंधीत सेवा.

६. अन्न,औषध व औषधी उपकरणे यांची ऑनलाईन डिलेवरीची सुविधा देणारे आस्थापना.

७. अत्यावश्यक किराणा सामान, दुध / दुग्धोत्पादने,फळे ,अंडे,मांस व मच्छी व भाजीपाला,औषधालये,जिवनावयक वस्तू व त्याची वाहतूक आणि माल साठवणूक.

८. प्राण्यासाठी खाद्य व इतर दूकाने व आस्थापना.

९. घरपोच अन्न सेवा देणा-या दूकाने व आस्थापना

१०. दवाखाने,औषधी दुकाने,चम्प्याची दुकाने,औषधी उत्पादन करणा-या कंपन्या,त्यांचे वितरक,आणि त्या बाबतची वाहतूक.

११. पेट्रोल पंप,एलपीजी गॅस,ऑईल एजन्सी व त्यांचे गोदाम व वाहतूक.

१२. अत्यावश्यक सेवा पूरवविण्यासाठी खाजगी सुरक्षा व सुविधा देणा-या आस्थापना.

१३. खाजगी आस्थापना ज्या कोव्हीड-१९ च्या प्रतिबंधा साठी जिवनावश्यक वस्तू व इतर मदत करणार आहेत अशा संस्था व आस्थापना.

१४.वरील पूरवठा साखळी जी वरील बाबींना मदत करेल.

१५. सर्व प्रतिबंधात्मक योजना लागू करणा-या व्यक्तींनी नोंद घ्यावी की,सदरील निर्बध हे व्यक्तीच्या हालचालीवर असून माल आणि वस्तूवर नाही हे त्याचे मूळ तत्व आहे.

११. राज्य सरकारे व निमशासकीय कार्यालयामध्ये फक्त अत्यावश्यक सेवाच चालू राहतील.

१२.सर्व धार्मिक स्थळे तसेच इतर सर्व प्रार्थना स्थळे भावीकांना दर्शनासाठी पूर्णपणे बंद राहतील तथापी निमित धामिक विधी व पूजा-अर्च्या धार्मिक स्थळाच्या मूळ कर्मचा-यामार्फत चालू राहतील.

१३.सदरील आदेश शासकीय कर्तयावरील अधिकारी/कर्मचारी व अत्यावश्यक सेवा यांचेसाठी लागू राहणार नाही.

१४. यापूर्वी वेळोवेळी निर्ममित केलेले आदेश या आदेशासोबत कायम राहतील.

उपरोक्त आदेशाचे पालन न करणा-या व्यक्ती,संस्था अथवा समुह यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ तसेच भा.द.वि. १८६० चे कलम १८८ शिक्षेस पात्र असलेला अपराध केला आहे असे समजण्यांत येईल आणि पूढील दंडात्मक कारवाई करण्यांत येईल याची नोंद सर्व संबंधीतांनी घ्यावी.

सदर आदेशाची अंमलबजावनी आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

Ravindra Laxman Binwade

Digitally signed by Ravindra Laxman Binwade
Date: 2020.03.23 23:10:25 +05'30'

**(रविंद्र बिनवडे)** भा.प्र.से.
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना**

**प्रत (तात्काळ आवश्यक कार्यवाहीस्तव)**

१. पोलीस अधिक्षक,जालना.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.जालना.

३. उपविभागीय दंडाधिकारी,जालना/भोकरदन/परतूर/अंबड.

४. सर्व तहलिसदार तथा कार्यकारी दंडाधिकारी,जालना/बदनापूर/भोकरदन/जाफ्राबाद/परतूर/मंठा/अंबड/घनसावंगी.

५. जिल्हा माहिती अधिकारी,जालना.

६. सर्व मुख्याधिकारी नगर परिषद/नगरपंचायत जि.जालना.

७.उपचिटणीस गृह शाखा, जि.अ.का. जालना.

८.सर्व विभाग प्रमुख जि.जालना.

**प्रतिलीपी (माहितीस्तव)**

१.मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय मुंबई.